लोकमत

# अर्जुन राजगे अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते : माने

लोकमत न्यूज नेटवर्क

**रूकडी माणगाव** : प्राचार्य डॉ. अर्जुन राजगे यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रातील एका अभ्यासू व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत. महाविद्यालयाचा नावलौकिक शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात उंचावण्यासाठी डॉ. राजगे सर यांनी यशस्वी प्रयत्न केले. त्यामुळे त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या संचालकपदी २०१० ते २०१५ या कालावधीत काम करण्याची संधी मिळाली होती, असे प्रतिपादन शोकसभेत माजी खासदार निवेदिता माने यांनी केले.

रुकडी येथे बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्टच्या सभागृहात शोकसभा आयोजित करण्यात आली होती.

माने म्हणाल्या, प्राचार्य डॉ. राजगे ग्रामीण भागातून कमवा व शिका योजनेतून शिक्षण पूर्ण करून आलेले असल्यामुळे रुकडीसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या मार्गदर्शनाची गरज आहे हे ओळखून त्यांनी महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले. शोकसभेत प्रा.डॉ. लता मोरे, प्रा.डॉ.आरती भोसले, प्रा.डॉ.स्मिता राणे, सौ. उज्ज्वला बुले, सौ.पद्मा पाटील, सौ. आशा राऊत, प्रा.डॉ. प्रशांतकुमार कांबळे यांनी भावना व्यक्त केली.

लोकमत

# राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य प्रेरणादायी : गुप्ता

लोकमत न्यूज नेटवर्क

कसबा बावडा : शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत विविध महाविद्यालयांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागाकडून सुरू असलेले कार्य प्रेरणादायी आहे. अशा उपक्रमांना डी. वाय. पाटील ग्रुपचे नेहमीच पाठबळ राहील, अशी ग्वाही ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ एन.एस.एस. विभागाचा वार्षिक आढावा व नियोजन बैठक कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे नुकतीच झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक अभय जयभाये हे होते. यावेळी डॉ. गुप्ता म्हणाले की, शिवाजी विद्यापीठच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य उत्तम प्रकारे सुरू आहे. कोरोना काळात आपत्ती व्यवस्थापन, 'माझे गाव कोरोनामुक्त' अभियान, भूजल व्यवस्थापन हा कार्यक्रम राबवून राष्ट्रीय सेवा योजनेने एक आदर्श घालून दिला आहे.

यावेळी जिल्ह्याचे समन्वयक प्रा. संजय पाटील, डॉ. प्रमोद चौगुले, डॉ. राजेंद्र रायकर उपस्थित होते.

26 AUG 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## कोल्हापूरच्या युवा संशोधकांची 'नॅनो सायन्स'मध्ये कामगिरी

# गोमूत्राचा वापर करून औद्योगिक प्रदूषणावर नियंत्रण

## मिथिलीन ब्ल्यू आणि क्रिस्टल व्हायोलेट या घातक रंगद्रव्यांवरील संशोधन 'नेचर'मध्ये प्रसिद्ध

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'जगात भारी कोल्हापुरी' ही बिरुदावली अगदी खरी करून दाखवणारी कामगिरी कोल्हापूरच्या दोन उदयोन्मुख संशोधकांनी करून दाखवली आहे. प्रशांत सारवळकर आणि ऋतुजा मांडवकर ही या युवा संशोधकांची नावे.

गोमूत्राचा कल्पकतेने वापर करून चांदी धातूचे विघटन करून त्यांनी त्यापासून रूपेरी सूक्ष्म कण (नॅनो पार्टीकल्स) तयार केले आणि त्या माध्यमातून औद्योगिक घातक रसायने मिथिलीन ब्ल्यू आणि क्रिस्टल व्हायोलेट या रंगद्रव्यांचे विघटन केले. त्यांच्या संशोधनाने वस्त्रोद्योगातील रासायनिक प्रदूषण कमी करण्यास मदत होणार आहे. हे एक प्रकारे पर्यावरण संरक्षणाचे मोठे काम आहे.

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी असलेले


प्रशांत सारवळकर


ऋतुजा मांडवकर

प्रशांत डी. सारवळकर आणि ऋतुजा आर. मांडवकर यांनी केलेले हे संशोधन नुकतेच २० ऑगस्ट २०२१ रोजी लंडनच्या 'नेचर' या नियतकालिकाच्या 'सायन्टिफिक रिपोर्ट'मध्ये प्रसिद्ध झाले आहे.

या संशोधनाचा वापर होण्यास कदाचित आणखी दोन-तीन वर्षे लागतील. परंतु, प्राचीन वैद्यकशास्त्राने रामबाण ठरविलेल्या आणि आयुर्वेदाची प्रभावी उपचार संहिता म्हणून परिणामकारक ठरलेल्या भारतीय गायीच्या (गीर गाय) मूत्राचा प्रभावी वापर करून

**■ शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा**

विज्ञानातील अनाकलनीय पैलू उघड केले जाऊ शकतात, हे या दोन उदयोन्मुख संशोधकांनी दाखवून दिले आहे.

**संशोधन नेमके काय आहे?**

'सिन्थेसिस ऑफ सिल्व्हर नॅनो पार्टिकल्स युजिंग बॉस टॉरस (ए-२) युरिन' हा या दोघांच्या संशोधनाचा विषय आहे. चांदीचे अब्जांश कण त्यांनी गोमूत्रापासून तयार केले. वस्त्रोद्योगातून बाहेर सोडल्या जाणाऱ्या अत्यंत विषारी, प्रदूषित पाण्याच्या शुद्धीकरणासाठी या जैवरासायनिक अभिक्रियेचा वापर करण्यात आला. ०.१ ग्रॅम द्रव पदार्थ प्रदूषित १ लिटर पाणी शुद्ध करण्यासाठी पुरेसा आहे, हे या संशोधनाने सिद्ध केले.

**गोमूत्राचे आयुर्वेदातील स्थान काय?**

चांदीच्या अब्जांश कणाचा वापर भारतीय प्राचीन परंपरा लाभलेल्या आयुर्वेदात अत्यंत प्रभावीपणे करण्यात आला आहे. आयुर्वेदात चांदीच्या सूक्ष्म कणांना रौप्यभस्म म्हणून ओळखले जाते. हे अब्जांश कण आणि सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे यांचा एकत्रित परिणाम साधत वस्त्रोद्योगातील घातक रंगयुक्त रासायनिक पदार्थयुक्त सांडपाण्यातील विषारी रंगांचे प्रमाण कमी करतात, हे वरील प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे.

या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. निरज प्रसाद (नॅनो सायन्स, शिवाजी विद्यापीठ), प्रो. डॉ. गणेश कांबळे (केआयटी, रसायनशास्त्र विभाग) आणि नॅनो सायन्स विभागाचे प्रमुख डॉ. किरणकुमार शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# २७,४२० विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आयोजित विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाई परीक्षा झाल्या आहेत. बुधवारी २८ हजार ८१२ विद्यार्थ्यांपैकी २७ हजार ४२० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी परीक्षा विभागातील अधिकारी व सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती. बुधवारी (दि. १८ ऑगस्ट) पार पडलेल्या परीक्षांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींमुळे परीक्षा देता आली नाही, अशा विद्यार्थ्यांनी सदर परीक्षेची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात आलेल्या **unishivaji.ac.in/online.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर भरावी असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची ४ सप्टेंबरची परीक्षा पुढे ढकलली

कोल्हापूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी दुय्यम सेवा अराजपत्रिय गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० दि. ४ सप्टेंबर रोजी होणार आहे. यामुळे या दिवशी शिवाजी विद्यापीठामार्फत सुरू असलेल्या परीक्षेचे कोणतेही पेपर होणार नाहीत. ४ सप्टेंबर रोजीचे सर्व पेपर्स दि. ५ सप्टेंबर रोजी यापूर्वी जाहीर केलेल्या वेळेप्रमाणे होणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील मार्च / एप्रिल २०२१ उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा १० ऑगस्टपासून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत.

पुढारी



कोल्हापूर : 'एनएसएस'च्या वार्षिक आढावा बैठकीचे उद्घाटन डॉ. अनिलकुमार गुप्ता यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित मान्यवर.

# 'एनएसएस'चे कार्य प्रेरणादायी : डॉ. गुप्ता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) विभागाकडून सुरू असलेले कार्य प्रेरणादायी आहे. अशा उपक्रमांना डी. वाय.पाटील ग्रुपचे नेहमीच पाठबळ राहील, अशी ग्वाही ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी दिली.

कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे 'एनएसएस'च्या वार्षिक आढावा बैठकीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक अभय जयभाये होते.

डॉ. प्रमोद चौगुले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आदिनाथ कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राजेंद्र रायकर यांनी आभार मानले.

पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd: 1962
NAAC 'A++' Grade

## Admission Notification

### Ph. D. Programme for AICTE Doctoral Fellow (ADF) for 2021-22

Online Applications are invited from eligible candidates for admission to Ph. D. programme under AICTE Doctoral Fellowship (ADF) for academic year 2021-22.

For details please visit : **www.unishivaji.ac.in**

Application forms are available on web link : **http://unishivaji.ac.in/online_portal**

**Important dates :**

Starting date of online applications : **26th August, 2021**

Closing date of online application : **10th September, 2021**

Place: Kolhapur
Date : 26 / 08 / 2021

**Prof. (Dr.) V. D. Nandavadekar**
Registrar

पुण्यनगरी

# कवी देशपांडेंची ग्रंथसंपदा विद्यापीठाकडे सुपूर्द

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जुन्या पिढीतील ज्येष्ठ दिवंगत कवी ना. वा. तथा नारायण वामन देशपांडे यांच्या इच्छेनुसार त्यांची समग्र ग्रंथसंपदा त्यांच्या पत्नी सुनंदा देशपांडे यांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राकडे सुपूर्द केली. विद्यापीठाच्या वतीने उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी स्वीकार केला.

कवी ना. वा. देशपांडे यांनी त्यांच्या हयातीत कविता, गीतांसोबतच अनेक नामवंत शाहिरांसाठी लेखन केले. त्यांचे दोन वर्षांपूर्वी वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्याकडे महाभारत, भगवद्गीता, त्यावरील भाष्ये, संतसाहित्यासह अनेकविध



प्रकारची दुर्मिळ ग्रंथसंपदा होती. त्यावर त्यांचे जीवापाड प्रेम होते. आपल्या माघारी ही ग्रंथसंपदा चांगल्या ठिकाणी जावी आणि भावी पिढ्यांच्या उपयोगी पडावी, अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या पत्नी सुनंदा यांनी त्यांच्या ग्रंथसंपदेचा जिव्हाळ्याने सांभाळ केला आणि बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास देणगी स्वरूपात एकूण ४५६ ग्रंथ उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांच्याकडे सुपूर्द केले. डॉ. सुतार यांनी त्यांच्या मंगळवार पेठेतील घरी जाऊन त्यांचा स्वीकार केला. प्रा. शशिकांत चौधरी यांचे या प्रक्रियेसाठी सहकार्य लाभले.

कवी ना. वा. देशपांडे हे कोल्हापुरातील अनेक शाहिरांचे लाडके कवी होते. त्यांच्या अनेक रचना संगीतकार कै. दिनकरराव पोवार यांनी संगीतबद्ध केल्या आहेत. शीघ्रकवी लहरी हैदर, ज्येष्ठ कवी ग. दि. माडगूळकर आणि ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी सावंत यांच्याशी त्यांचा मोठा स्नेह होता. छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारकार्याचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.

2 6 AUG 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांतर्गत एनएसएसचे कार्य प्रेरणादायी

## डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत विविध महाविद्यालयांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाकडून सुरू असलेले कार्य प्रेरणादायी आहे. अशा उपक्रमांना डी. वाय. पाटील ग्रुपचे नेहमीच पाठबळ राहील, अशी माहिती ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ एनएसएस विभागाचा वार्षिक आढावा व नियोजन बैठक कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे झाली. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक अभय जयभाये हे होते. डॉ. गुप्ता म्हणाले, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य अत्यंत उत्तम प्रकारे सुरू आहे. नवनियुक्त विभागीय समन्वयकाचा परिचय जिल्ह्याचे समन्वयक प्रा. संजय पाटील यांनी करून दिला. प्रास्ताविक डॉ. प्रमोद चौगुले यांनी केले. डॉ. राजेंद्र रायकर यांनी आभार मानले. सूत्रसंचालन समन्वय प्रा. आदिनाथ कांबळे यांनी केले.

बैठकीस संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्षगृह राज्यमंत्री सतेज डी. पाटील व विश्वस्त ऋतुराज पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



**कसबा बावडा: नियोजन बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता. सोबत डॉ. प्रमोद चौगले, डॉ. राजेंद्र रायकर, प्रा. संजय पाटील, अभय जयभाये, प्रा. आदिनाथ कांबळे.**

सकाळ

# कवी ना. वा. देशपांडे यांची ग्रंथसंपदा विद्यापीठाकडे सुपूर्द

**टेंबलाईवाडी, ता. २५ :** जुन्या पिढीतील ज्येष्ठ दिवंगत कवी ना. वा. तथा नारायण वामन देशपांडे यांच्या इच्छेनुसार त्यांची समग्र ग्रंथसंपदा त्यांच्या पत्नी सुनंदा देशपांडे यांनी आज शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राकडे सुपूर्द केली. विद्यापीठातर्फे उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी त्याचा स्वीकार केला.

कवी देशपांडे यांनी त्यांच्या हयातीत कविता, गीतांबरोबरच अनेक नामवंत शाहिरांसाठी लेखन केले. त्यांचे दोन वर्षांपूर्वी वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्याकडे महाभारत, भगवद्‌गीता, त्यांवरील भाष्ये, संत साहित्यासह अनेकविध प्रकारची दुर्मिळ ग्रंथसंपदा होती. त्यावर त्यांचे जीवापाड प्रेम होते. आपल्या माघारी ही ग्रंथसंपदा चांगल्या ठिकाणी जावी, भावी पिढ्यांच्या उपयोगी पडावी, अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या माघारी पत्नी सुनंदा यांनी त्यांच्या ग्रंथसंपदेचा सांभाळ केला. आज त्यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयास देणगी स्वरूपात ४५६ ग्रंथ उपग्रंथपाल डॉ. सुतार यांच्याकडे सुपूर्द केले. डॉ. सुतार यांनी त्यांच्या मंगळवार पेठेतील घरी जाऊन त्यांचा स्वीकार केला. प्रा. शशिकांत चौधरी यांचे सहकार्य लाभले.



**टेंबलाईवाडी : दिवंगत कवी ना. वा. देशपांडे यांचा ग्रंथसंग्रह शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्याबाबतचे पत्र उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांना देताना सुनंदा देशपांडे.**

### शाहिरांचे लाडके कवी

कवी देशपांडे कोल्हापुरातील अनेक शाहिरांचे लाडके कवी होते. त्यांच्या अनेक रचना संगीतकार कै. दिनकरराव पोवार यांनी संगीतबद्ध केल्या आहेत. शीघ्रकवी लहरी हैदर, ज्येष्ठ कवी ग. दि. माडगूळकर, ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी सावंत यांच्याशी त्यांचा मोठा स्नेह होता. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारकार्याचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.

तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी परीक्षा बुधवारी सुरळीत पार पडली. २८८१२ पैकी २७४२० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईनिंग, बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग ॲन्ड फॅशन को-ऑर्डीनेशन आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील परीक्षा वेळापत्रकात बदल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १० ऑगस्टपासून उन्हाळी परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरु आहेत. दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रिय गट–ब संयुक्त पूर्व परीक्षा ४ सप्टेंबर रोजी घेण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. ४ सप्टेंबर रोजी होणारे सर्व विषयांचे पेपर रविवार ५ सप्टेंबर रोजी होणार आहेत. याची दखल महाविद्यालय, विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन गजानन पळसे यांनी केले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठात आज लैंगिक छळ प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या अंतर्गत तक्रार समिती व बेटी बचाओ अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने "कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध""" या विषयावर एक ऑनलाईन जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा जागृती कार्यक्रम गुरूवारी २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठात होणार आहे. तरी सर्व विभागातील व संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील बेटी बचाओ अभियान समन्वयक यांनी ऑनलाईन उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे.